डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
सत्यमेव जयते
barti
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

# प्रेस नोट

दि. २३/०२/२०१७

# कृपया प्रसिद्धीसाठी

## संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा मुख्य परीक्षा -२०१६ मध्ये बार्टीच्या विद्यार्थ्यांचे यश

मा.श्री.राजेशजी ढाबरे, महासंचालक, बार्टी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टीच्या स्पर्धा व व्यावसायिक परीक्षा विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा-२०१६ परीक्षेच्या तयारी साठी दिल्ली येथील नामवंत कोचिंग क्लासेस तसेच यशदा, पुणे व राज्य प्रशासकिय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC) मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, कोल्हापूर प्रायोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेले एकूण ८ विद्यार्थी नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०१६ उत्तीर्ण होऊन "व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेस" पात्र ठरले आहेत. या वर्षी बार्टी मार्फत प्रशिक्षण घेत असलेल्या व मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या एकूण ६३ विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीकरीता बार्टी मार्फत सुविधा पुरविण्यात आल्या होत्या.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मा. महासंचालक यांनी अभिनंदन केले आहे व व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचे जे उमेदवार मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, त्या सर्वांसाठी बार्टीमार्फत **‘व्यक्तिमत्व चाचणी प्रशिक्षण कार्यशाळा’** राबविण्यात येणार आहे अथवा त्यांना रक्कम रुपये २०,०००/- इतके ‘विशेष आर्थिक सहाय्य’ देण्यात येणार आहे. तरी, बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती.प्रणाली दहिवाळ, प्रकल्प संचालक यांनी केले आहे.

प्रसिध्दी विभाग, बार्टी